दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरुवार दि.२ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २१४ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thursday 2 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 214 | Pages 4 | Rate 4 Rs







# अशोक खरातने अजित पवारांवर जादूटोणा केला

## दादांसह महाराष्ट्रातील आणखी एका मोठ्या नेत्याच्या फोटोवर मारल्या फुल्या–रोहित पवार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी मंगळवारी पुन्हा एकदा अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूचा संबंध भोंदू अशोक खरातशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. भोंदू अशोक खरातकडे फोटोवर फुल्या मारण्याची पद्धत होती. त्यानुसार अजितदादांसह महाराष्ट्रातील एका अत्यंत बड्या नेत्याच्या फोटोवर फुल्या मारण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्याने कुणाच्या सांगण्यावरून या फोटोंवर फुल्या मारण्याचा जादूटोणा केला? असा सवाल रोहित पवार यांनी यासंबंधी उपस्थित केला आहे.भोंदू अशोक खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. सध्या तो नाशिक पोलिसांच्या कोठडीत आहे. त्याच्यावर नाशिक पोलिसांत तब्बल १० गुन्हे दाखल करण्यात आलेत. यापैकी ८ गुन्हे लैंगिक शोषणाचे, तर उर्वरित २ गुन्हे हे आर्थिक फसवणुकीचे आहेत. खरातशी संबंध असल्याच्या कारणावरून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर यांना प्रथम राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद व त्यानंतर राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी उपरोक्त आरोप केला आहे.रोहित पवार यासंबंधी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, जादूटोणासारख्या अंधश्रद्धांना महाराष्ट्र कधीही भीक घालत नाही परंतु जादूटोणा करणाऱ्या कलुषित मनोवृत्तींचा हेतू दुर्लक्षून चालणार नाही. भोंदू अशोक खरात याच्याकडे फोटोवर फुल्या मारण्याची पद्धत होती. त्यानुसार अजितदादा यांच्यासह महाराष्ट्रातल्या एका अत्यंत बड्या नेत्याच्या फोटोवर फुल्या मारण्यात आल्याचं समजतंय. या भोंदू खरातने कुणाच्या सांगण्यावरून फोटोवर फुल्या मारण्याचा जादूटोणा केला? ज्यांच्या सांगण्यावरून जादूटोणा केला त्यांचा हेतू काय होता? हेही समोर येणं गरजेचं आहे.डॉ. नरेंद्र दाभोळकरांच्या महाराष्ट्रात कर्तृत्वापेक्षा आणि जनतेच्या कामांपेक्षा असल्या भोंदूगिरीवर विश्वास ठेवला जात असेल तर पुढच्या पिढीला काय संदेश जाणार आहे? हे प्रकरण जेवढं भयावह आहे तेवढंच महाराष्ट्राच्या भविष्यालाही घातक आहे. त्यामुळं या भोंदूबाबाच्या माध्यमातून जादूटोणा करणाऱ्या अंधभक्तांचे खरे चेहरे समोर यायलाच हवेत.



### अशोक खरातला तुरुंगातच संपवण्याचा डाव

तत्पूर्वी, सकाळी रोहित पवार यांनी अशोक खरातला तुरुंगातच संपवण्याचा डाव रचला जात असल्याचा आरोप केला होता. यामुळे राज्याच्या राजकारणात एकच खळबळ माजली होती. ते म्हणाले होते, खूप काही जणांची खूप काही माहिती असलेल्या भोंदू खरातचे धागेदोरे मोठमोठ्या नेत्यांपर्यंत येऊन पोहचल्याने आत्महत्या किंवा इतर काही दाखवून खरातला संपवायचं तर दुसरीकडं अजितदादांच्या अपघाताची इत्तंभूत माहिती असलेल्या व्ही के सिंगला काहीही झालं तरी वाचवायचं अशा चर्चा आहेत.दोषींना शिक्षा झालीच पाहिजे, पण सत्य दडपण्यासाठी कोणाचा जीव घेतला जात असेल किंवा सत्य दडपण्यासाठी कोणाला दोषातून वाचवलं जात असेल तर या दोन्ही बाबी योग्य नाहीत. अशी राजकीय रणनीती कुणी आखत असेल तर महाराष्ट्राच्या जनतेला हे अजिबात आवडणार तर नाहीच उलट लोकांचा व्यवस्थेवरचा विश्वास उडेल. सत्य लपवण्यासाठी एवढा अट्टहास का? अशाने सत्य लपणार आहे का? असो, 'कितीही प्रयत्न केला तरी सत्य लपवता येत नाही, ते कधीतरी बाहेर येतंच' याचा अनेकांना विसर पडलेला दिसतोय, असे ते म्हणाले होते.

# लिंबागणेश परिसरात रानडुकरांचा उपद्रव पिकांचे मोठे नुकसान,नुकसानभरपाईची मागणी

## सौर कुंपण योजना सरसकट लागू करण्याची मागणी–डॉ.गणेश ढवळे

दैनिक वादळ वार्ता

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील लिंबागणेश भागात सध्या रानडुकरांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. उन्हाळ्यामुळे पाण्याचे स्त्रोत आटल्याने अन्नाच्या शोधात रानडुकरे व इतर भटकी जनावरे थेट शेतात घुसून उभी पिके जमीनदोस्त करत आहेत. खाण्यापेक्षा पिकांची नासाडीच अधिक होत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत.या पार्श्वभूमीवर वनविभागाने तात्काळ पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

**रात्री पाणी देताना जीव धोक्यात**

**रामदास मुळे (नुकसानग्रस्त शेतकरी)**

सध्या दिवसा वीज उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना रात्री पिकांना पाणी द्यावे लागते.



यावेळी रानडुकरे अंगावर येण्याचा धोका निर्माण होत असून शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.काबाडकष्टाने उभे केलेले बाजरी, ज्वारी, मका यांसारखे पिक रानडुकरांकडून पूर्णपणे उद्धस्त होत आहे. तलाठी यांना माहिती दिल्यावर फोटो पाठवण्यास सांगितले जाते; मात्र साधा मोबाईल असल्याने ते शक्य होत नाही, असे नुकसानग्रस्त शेतकरी रामदास मुळे यांनी सांगितले.तसेच तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी व रानडुकरांचा बंदोबस्त करावा, अशी त्यांनी मागणी केली.

**सौर कुंपण योजना सर्व गावांना लागू करावी – डॉ. गणेश ढवळे**

डॉ. श्यामाप्रसाद जन-वन-विकास योजनेअंतर्गत सध्या फक्त जंगलालगतच्या गावांना सौर कुंपणाचा लाभ दिला जातो. मात्र रानडुकरे, मोर, हरिण यांसारख्या वन्यजीवांचा त्रास अनेक गावांमध्ये होत असल्याने ही योजना सर्व गावांमध्ये सरसकट लागू करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

# नांदुरा कृषी उत्पन्न बाजार समितीचा शेतकरी कन्या पुत्र अभ्यासिका पॅटर्न राज्यभर राबवला पाहिजे-जरांगे पाटील

दैनिक वादळ वार्ता

**नांदुरा । प्रतिनिधी**



शेताच्या बांधावर घाम गाळणाऱ्या बापाच्या मुलाने किंवा मुलीने एक दिवस कलेक्टर व्हावं, अधिकारी व्हावं, डॉक्टर व्हावं... हे स्वप्न महाराष्ट्रातल्या प्रत्येक शेतकरी कुटुंबाने उराशी जपलेलं आहे. आज त्या स्वप्नाला एक नवी ताकद मिळाली.मराठा समाजाच्या न्यायलढ्याचे नेते मनोजदादा जरांगे-पाटील यांनी आंतरवली सराटी येथे एका महत्त्वपूर्ण भेटीत शेतकरी कन्या-पुत्र एमपीएससी, यूपीएससी विकास क्रांती संघटनेच्या अभ्यासिकेचा नांदुरा पॅटर्न राज्यभर राबवण्याची आवश्यकता बोलून दाखवली. शेतकरी कन्या पुत्र अभ्यासिकेचे प्रणेते मा.राजेशभाऊ गावंडे यांच्या नेतृत्वात टीमने त्यांच्या आंतरवली सराटी येथे प्रत्यक्ष भेट घेऊन शेतकरी कन्या पुत्र एमपीएससी, यूपीएससी विकास क्रांती संघटनेच्या नांदुरा पॅटर्नची संपूर्ण संकल्पना त्यांच्यासमोर मांडली.शेतकऱ्यांच्या मुलामुलींना मोफत व दर्जेदार अभ्यासाची सोय, स्पर्धा परीक्षांची तयारी, एकत्रित अभ्यासाचे वातावरण हे सारं ऐकून दादांचे डोळे चमकले. हा विषय मला खूप आवडला. शेतकऱ्यांच्या मुलांसाठी हे व्हायलाच हवं. हा विषय मार्गी लावू, असे शब्द दादांनी दिले. आणि मनोजदादांचा शब्द म्हणजे लाखो शेतकऱ्यांचा विश्वास. ज्या शेतकऱ्याने आयुष्यभर कर्जाच्या विळख्यात जगत आपल्या मुलाला पुस्तक दिलं, त्या बापाच्या तपश्चर्येला आता राज्याच्या पातळीवर आवाज मिळतो आहे. नांदुऱ्यात रुजलेलं हे रोपटं आता महाराष्ट्रभर वाढण्याची वेळ आली आहे. शेतकरी कन्या-पुत्र अभ्यासिका हे केवळ इमारतीचं नाव नाही. ती एका पिढीची उमेद आहे. ती उमेद टिकावी यासाठी बळीराजाच्या पाठीमागे ताकत उभी करण्याची वेळ आली आहे. अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.अभ्यासिकेच्या टीममध्ये राजूभाऊ गावंडे, थोरात सर, पद्माकर ढोले, अक्षय बोचरे, दीपक फाळके, उध्दव गावंडे सर इत्यादी हजर होते.

# 'जय भगवान'च्या जयघोषात बडेवाडीमध्ये श्री क्षेत्र भगवानगडाच्या ९२ व्या नारळी सप्ताहाचा प्रारंभ

### गाव छोटं पण मन मोठं असणाऱ्या बडेवाडीला सहकार्य करा

**श्री क्षेत्र भगवानगडाचा नारळी सप्ताह पार पडत असलेले बडेवाडी हे गाव मनाने आणि श्रद्धेने खूप मोठे आहे. परंतु लोकसंख्येने अत्यल्प असल्यामुळे सप्ताहासाठी येणाऱ्या लाखो भाविकांची जेवणाची गैरसोय होऊ नये म्हणून परिसरातील सर्व गावांनी आलेल्या भाविकांना जेवण वाढण्यासाठी मदत करावी असे आवाहन ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी केले.**

### येणाऱ्या दसऱ्याला नवीन महंत गादीवर बसवणार

**यावर्षी येणाऱ्या दसऱ्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. या अमृतमहोत्सवी वर्षामध्ये दसऱ्याच्या दिवशीच श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांचा अभिषेक करून त्यांना श्री क्षेत्र भगवानगडाच्या गादीवर बसवण्यात येणार असल्याची माहिती ह.भ.प. महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ. श्री नामदेव महाराज शास्त्री बाबा यांनी स्वत: दिली.**

दैनिक वादळ वार्ता

**भगवानगड । प्रतिनिधी**

श्री संत भगवानबाबांनी प्रारंभ केलेल्या नारळी सप्ताहाच्या ९२ व्या वर्षीचे यजमानपदाचे शिवधनुष्य हे भगवानगडाच्या दक्षिण बाजूला असलेल्या बडेवाडी ग्रामस्थांनी उचलले आहे. श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती, ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली या सप्ताहाचा आज प्रारंभ झाला. श्री संत भगवानबाबांनी फिरता नारळी सप्ताहाचा नाविन्यपुर्ण उपक्रम ९२ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र नारायणगडाच्या पायथ्याशी असलेल्या पखालडोह या ठिकाणी सुरू केला. त्यांचे पश्चात तीच सप्ताहाची परंपरा श्री क्षेत्र भगवानगडाचे द्वितीय उत्तराधिकारी अष्टपैलू संत, वै.ह.भ.प.गुरुवर्य श्री संत भिमसिह महाराज यांनी सुरू ठेवत बाबांचे कार्य सुरू ठेवले होते. वै.गुरुवर्य भीमसिंह महाराजांच्या वैकुंठगमनानंतर श्री क्षेत्र भगवानगडाचे तृतीय उत्तराधिकारी तथा विद्यमान मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली या सप्ताहाची एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे. हा नारळी सप्ताह वैभवशाली असल्याने संपूर्ण महाराष्ट्रातून लाखो भाविक सप्ताहामध्ये



आठवडाभर उपस्थित असतात. नारळाचे यजमानपद स्विकारलेले ग्रामस्थ आठवडाभर तन, मन आणि धन खर्ची घालत श्रीगुरूंची सेवा करत असतात .

३१ मार्च रोजी हा महोत्सव प्रारंभ झाला असून सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली भागवताचार्य ह.भ.प. श्री.प्रकाश महाराज साठे यांच्या अमृततुल्य रसाळवाणीतून ७ दिवस भव्य श्रीमद् भागवत कथा निरूपण सोहळ्याचा उपस्थित लाखो भाविकांना लाभ होणार आहे. सप्ताहामध्ये ह.भ.प.महंत श्री.रामगिरी महाराज (येळेश्वर संस्थान येळी), ह.भ.प. भागवताचार्य श्री.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, ह.भ.प.श्री.ज्ञानेश्वर महाराज जळकीकर, ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदोरीकर, ह.भ.प.श्री.प्रभाकर महाराज बोधले पंढरपूरकर, श्री क्षेत्र भगवानगडाचे उत्तराधिकारी ह.भ.प.महंत श्री.कृष्णा महाराज शास्त्री यांच्या कीर्तन सेवा होणार असून सप्ताहाच्या सातव्या दिवशी रात्री ठीक ८:३० ते ११ या वेळेत श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे जागराचे जाहीर हरीकीर्तन होणार आहे. त्यानंतर काल्याच्या दिवशी श्री क्षेत्र भगवानगडाचे मठाधिपती ह.भ.प.महंत श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाने सप्ताहाची सांगता होईल. सप्ताहामध्ये दररोज पहाटे काकडा भजन, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, हरिपाठ इ. धार्मिक कार्यक्रम होत आहेत.

# संपादकीय

## बडगा उगारलाच पाहिजे!



मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा म्हणजे आर्थिक वर्षाची अखेर. बँका, वित्तीय संस्था, कॉर्पोरेट यांची हिशेब पूर्ण करण्याची घाई ३१ मार्च जवळ येतो, तशी वाढत जाते. मात्र या निमित्ताने सरकारच्या विविध खात्यांची वर्षाच्या सुरुवातीला अर्थसंकल्पाद्वारे मंजूर झालेला निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याची धावपळ, याला 'काळा विनोद'च म्हणायला हवे. जनतेकडून करसंकलनाच्या माध्यमातून सरकार जनकल्याणासाठी ज्या योजना जाहीर करते, त्यावर नियत व्यय म्हणून जो निधी अर्थसंकल्पात जाहीर होतो, तो पूर्णपणे खर्च होत नसेल तर ही सरकारसाठी मोठीच नामुष्की म्हणायला हवी. गेल्या चार-पाच वर्षांची योजनांवरील खर्चाची आकडेवारी पाहिली तर ती साधारण साठ टक्क्यांच्या आसपास दिसते. याचाच अर्थ चाळीस टक्के निधी योजनांवर खर्च करण्याची सरकाराची असमर्थता यातून दिसते. यंदाच्या आर्थिक वर्षात विविध योजनांवर ठरलेल्या निधीच्या केवळ साठ टक्केच खर्च करण्यातच राज्य सरकार यशस्वी ठरले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा खर्च केवळ एखाद टक्क्याने वाढला आहे. सर्वाधिक खर्च हा महिला व बालकल्याण विभागाचा झाला असून तो जवळपास ८२ टक्क्यांच्या आसपास आहे. याचे कारण महिला व बालकल्याण विभागाच्या आंतर्गत येणारी 'लाडकी बहीण योजना'. सर्वाधिक कमी खर्च हा गृहनिर्माण विभागावर झालेला आहे. खरे तर सर्वाधिक शहरीकरण असलेल्या महाराष्ट्रात घरांची समस्या फार मोठी आहे. तरीही या विभागावर केवळ २२ टक्के सरकार खर्च होत असेल तर याला काय म्हणावे? याच पार्श्वभूमीवर आता मंत्रालयातील बाबूंचा उर्वरित ४० टक्के निधी कोणत्या ना कोणत्या चौकटीत बसवून खर्च करण्याचा आटापिटा सुरू आहे. रविवारी सुट्टी असतानाही शासन निर्णयांचे शतक सरकारने या निमित्ताने केले. सोमवारीदेखील मंजूर निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याचा खटाटोप सुरूच होता.एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता यावी म्हणून प्रशासकीय यंत्रणेसाठी १०० दिवसांचा व नंतर १५० दिवसांचा कृती आराखडा राबवण्यासारखा स्तुत्य उपक्रम घेतात. त्या अंतर्गत प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये जनताभिमुख कारभार करण्याची आपसात स्पर्धा व्हावी यासाठी पुरस्कार दिले जातात, तरीही मंजूर निधीच्या ६० टक्केच खर्च का होतो? सरकार कुणाचेही असो, प्रशासनातील आळस, कामाप्रति असलेला कंटाळा, जनतेच्या प्रश्नांप्रति नसलेली आपुलकी हीच यामागची कारणे आहेत. कोणताही प्रकल्प पूर्ण होण्यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधी लागती कामा नये, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठणकावून सांगितल्यानंतरही दर वर्षी निधी खर्च करण्यात प्रशासन असमर्थ ठरत असेल तर मुख्यमंत्र्यांनी ढिम्म प्रशासनाला जागे करण्यासाठी बडगा उगारणे गरजेचेच आहे. कंत्राटे देताना होणारी अनागोंदी हे देखील यामागील एक कारण. कंत्राटे देण्याचे काही निकष असले तरी प्रत्यक्षात ती देताना वेगळेच निकष लावले जातात. यामागे अर्थकारण व राजकारण या दोन्ही बाबी असतात. मात्र काहीही झाले तरी ठरलेले काम पूर्ण करणे इतकी किमान अपेक्षा कररूपाने सरकारी तिजोरी भरणाऱ्या जनतेची असते. सरकारी कामांच्या दर्जाबाबत जनता किती सहनशील आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मात्र कमी प्रतीची का असेनात, जनोपयोगी कामे व्हायला हवीत, इतकीही किमान अपेक्षा जनतेने ठेवायची नसेल तर जनतेला लोकशाहीच्या सबळीकरणासाठी मतदान करण्याचे आवाहन कशासाठी करायचे?

अर्थसंकल्पाच्या सुरुवातीलाच सगळ्याच खात्यांच्या योजनांचा आढावा घेऊन अर्थसंकल्पात नियत व्यय काय असेल हे ठरवले जाते. सुमारे साडेसात लाख कोटी आकारमान असलेला महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात विविध खात्यांना मिळालेला निधी कधीच पुरत नाही. विधिमंडळाच्या प्रत्येक अधिवेशनात यामुळेच अवाढव्य आकारमानाच्या पुरवणी मागण्या मंजूर करून घेतल्या जातात. सगळ्याच खात्यांच्या योजनांसाठी अर्थसंकल्पात मंजूर केलेला निधी पुरा पडत नाही व त्यामुळे पुरवणी मागण्या मंजूर करून घ्याव्या लागतात, तर या मंजूर झालेल्या निधीतील केवळ ६० टक्केच निधी प्रशासनाकडून खर्च होणे व त्यासाठी मार्चअखेर आला की शेवटच्या तीन चार दिवसांत काही ना काही कारणे देत शेकडो शासन निर्णय जारी करणे, हे सरकारच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. त्यामुळे आता तरी मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना केवळ तंबी न देता, त्यांच्यावर कारवाईचा बडगा उगारल्याशिवाय प्रशासनाला जाग येणार नाही, याची त्यांनी दखल घेतलेली बरी!

# 'मेट्रो वुमन' च्या हातात मुंबई महानगरपालिकेची कमान,अश्विनी भिडे ठरल्या पहिल्या महिला आयुक्त

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने आज, ३१ मार्च २०२६ रोजी आयएएस अधिकाऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात बदल्या जाहीर केल्या आहेत. या फेरबदलांमध्ये सर्वात महत्त्वाचा आणि ऐतिहासिक निर्णय म्हणजे अश्विनी भिडे (१९९५ च्या बॅच) यांची बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) आयुक्तपदी नियुक्ती. त्या मुंबई महानगरपालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त ठरल्या आहेत.सध्याचे आयुक्त भूषण गगराणी यांचा आज कार्यकाल संपत असून, उद्या अश्विनी भिडे पदभार स्वीकारणार आहेत. 'मेट्रो वुमन' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अश्विनी भिडे सध्या मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. मुंबई मेट्रो प्रकल्पासह अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये त्यांचा प्रमुख सहभाग राहिला आहे. त्या २०३० पर्यंत पूर्ण कार्यकाल पूर्ण करू शकतील अशी अपेक्षा आहे.

इतर प्रमुख बदल्या

लोकेश चंद्र (१९९३ बॅच) : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी (MSEDCL) चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पदावरून मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून नियुक्त.

विकास चंद्र रस्तोगी : कृषी विभागातील अतिरिक्त मुख्य सचिव पदावरून वित्त



विभागात अतिरिक्त मुख्य सचिव (आर्थिक सुधारणा) पदावर बदली.

विनिता वैद सिंगल : आपत्ती व्यवस्थापन विभागातून मृद व जलसंधारण विभागाच्या प्रधान सचिव पदावर नियुक्ती.

परिमल सिंह : 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प' (POCRA) येथून कृषी विभागाचे सचिव म्हणून बदली.

तुकाराम मुंढे : दिव्यांग कल्याण विभागातून आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सचिव पदावर नियुक्ती.

लहू माळी: शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लिमिटेड, मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्ती.

माणिक गुरसाल : दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव पदावर बदली.

प्रेरणा देशभ्रातार : राज्य कर विभागातून मत्स्यव्यवसाय आयुक्त म्हणून नियुक्ती.

पृथ्वीराज बी.पी. : पुणे महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्त पदावरून वसई-विरार महानगरपालिका आयुक्तपदी नियुक्ती.या बदल्या आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दिवशी करण्यात आल्या असून, राज्य प्रशासनात महत्त्वपूर्ण फेरबदल झाला आहे. अश्विनी भिडे यांच्या नियुक्तीमुळे मुंबई महानगरपालिकेच्या १३० वर्षांच्या इतिहासात प्रथमच महिला नेतृत्व येणार असल्याने प्रशासनात महिला सक्षमीकरणाची नवी दिशा मिळाली असल्याचे मानले जात आहे.नव्या अधिकाऱ्यांना लवकरात लवकर पदभार स्वीकारण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबई महानगरपालिका ही देशातील सर्वात मोठी आणि श्रीमंत नागरी संस्था असल्याने, नव्या आयुक्तांकडून पावसाळी पूर्वतयारी, पायाभूत सुविधा, स्वच्छता आणि शहरी विकासाच्या कामांना वेग मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या कार्यालय व मीटर रूमचा लोकार्पण सोहळा आमदार सुनील राऊत यांच्या हस्ते संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळीतील कन्नमवार नगरातील सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या विक्रोळीचा विकारहर्ताच्या कार्यालय व मीटर रूमचा लोकार्पण सोहळा विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांच्या हस्ते करण्यात आला.याप्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव, नगरसेवक दिपक सावंत, महिला विभाग संघटिका व माजी नगरसेविका रश्मी पहुडकर,उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, विक्रोळी ब्लॉक काँग्रेस चे अध्यक्ष राहुल वाघधरे,उपविभाग संघटिका वंदना बेंद्रे,अखिल सार्वजनिक गणेशोत्सव




महासंघाचे सचिव सुरेश सरनोबत, शिवराम मळगांवकर,शाखाप्रमुख अभय राणे,शाखा संघटिका आसावरी भोईटे,प्रिया गावडे,माजी महिला संघटिका अहिल्या थोरवे,लिना सुर्यवंशी,मंडळाचे अध्यक्ष समीर आचरेकर, सचिव अजय दळवी आदींसह महिला शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी मान्यवरांची मार्गदर्शन पर भाषणे झाली.यावेळी हासत नाचत खेळुया,मानाची पैठणी जिंकूया मान वहिनीचा,खेळ पैठणीचा हा महिलांचा रंगतदार कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमात शाखा संघटिका आसावरी भोईटे यांच्यासह चार जणी पैठणीच्या विजेत्या ठरल्या.त्यांना भांड्याचा सेट सुध्दा देण्यात आला.त्याचे वितरण रश्मी पहुडकर व वंदना बेंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमास महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

# ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या रेखाताई बोऱ्हाडे यांचा महापौरांनी केला गौरव ; रितू तावडे यांनी सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र केले प्रदान

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

जय महाराष्ट्र नगर बोरीवली पूर्व येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) च्या विधानसभा प्रमुख सौ. रेखा शांताराम बोऱ्हाडे यांना मुंबईच्या महापौर सौ. रितू तावडे यांच्या शुभहस्ते आज भायखळा येथे आयोजित करण्यात आलेल्या एका शानदार सोहळ्यात शाल श्रीफळ पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रेखा बोऱ्हाडे यांनी बोरीवली पूर्व येथील महिलांच्या विविध प्रकारचे उपक्रम हाती घेतले. स्त्री शक्तीचा जागर करण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले. त्यांच्या विधायक कार्याची दखल घेत मुंबई महापालिकेच्या नियोजन विभागाने आज आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात महापौर सौ. रितू तावडे यांनी उपमहापौर संजय घाडी आणि मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान केला.




यावेळी सौ. रेखा बोऱ्हाडे यांनी आपले 'ओंजळीतली फुले' हे पुस्तक महापौर सौ. रितू तावडे यांना भेट दिले. याबद्दल महापौरांनी त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा केली .

# कामगार कर्मचारी संघाची नवी मुंबई विमानतळ व्यवस्थापन समितीची कार्यकारिणी जाहीर:भाजपा प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्या उपस्थितीत घोषणा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीची भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष आणि अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी घोषणा करण्यात आली.भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात नवनियुक्त पदाधिका-यांना रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी सर्व नवनियुक्त पदाधिका-यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष अतुल



काळसेकर, अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघाचे सरचिटणीस सुहास माटे, संयुक्त सरचिटणीस रुपेश धुमाळे, संयुक्त सरचिटणीस योगेश आवळे, उपाध्यक्ष साई घोगळे, सचिव शरद येटम, कार्यकारी अध्यक्ष जितेंद्र राऊत, निशांत गायकवाड यांच्यासह कमर्चारी संघाचे पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी अखिल भारतीय माथाडी संघटनेची कार्यकारिणी ही घोषित करण्यात आली.यावेळी रविंद्र चव्हाण म्हणाले की , पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये तळागाळातील प्रत्येक घटकाला न्याय देणे, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन प्रशासन समन्वयातून सर्वांनी मिळून काम करायचे आहे . कोणावरही अन्याय होणार नाही आणि अन्याय आम्ही करणार नाही या भूमिकेतून काम करण्याची पद्धत अवलंबत न्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.नवी मुंबई विमानतळ व्यवस्थापन समितीच्या कार्यकारिणीमध्ये संयुक्त सरचिटणीस रुपेश धुमाळे, उपाध्यक्ष किरण पवार, युहान केर्सी दोराबाजी आणि सुजित न्यायनिर्गुणे यांची तर सचिव म्हणून प्रभुदास भोईर, मुखांश नाईक, गजानन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे.अखिल भारतीय माथाडी संघटनेची कार्यकारिणी घोषीत झाली त्यात रायगड जिल्हा अध्यक्षपदी जितेश शिंदे, भिवंडी पालघर जिल्हा उपाध्यक्षपदी सचिन जोशी, ठाणे उरण उपाध्यक्षपदी विक्रांत भोसले, दक्षिण मुंबई उपाध्यक्षपदी राहुल लहासे , वरळी विधानसभा अध्यक्षपदी शैलेश तोडकरी आणि वरळी विधानसभा सरचिटणीस पदी समीर शेख यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.

# जैन बांधवांकडून भिगवणमध्ये महावीर जयंती उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

महावीर जयंती हा जैन धर्मातील अत्यंत पवित्र आणि महत्त्वपूर्ण सण असून, भगवान महावीर स्वामींच्या जन्मोत्सवप्रमाणे दरवर्षी मोठ्या श्रद्धा आणि भक्तिभावाने साजरा केला जातो. यंदा २०२६ मध्ये ही जयंती आज, ३१ मार्च रोजी मंगळवारी साजरी होत असून, चैत्र शुक्ल पक्षातील त्रयोदशी तिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

भगवान महावीर हे जैन धर्माचे २४ वे आणि अंतिम तीर्थंकर मानले जातात. त्यांचा जन्म इ.स.पूर्व ५९९ मध्ये बिहारमधील कुंडलग्राम येथे झाला. वर्धमान या नावाने ओळखले जाणारे महावीरांनी वयाच्या ३० व्या वर्षी राजसुखांचा त्याग करून कठोर तपश्चर्या स्वीकारली. तब्बल १२ वर्षांच्या साधनेनंतर



त्यांनी कैवल्यज्ञान प्राप्त केले आणि मानवजातीला मोक्षमार्गाचा संदेश दिला. अहिंसा, सत्य आणि संयम या तत्त्वांचा प्रचार करून त्यांनी समाजाला नैतिक जीवनाची दिशा दाखवली.

महावीर स्वामींनी दिलेली पंचशील तत्त्वे आजही मानवाच्या जीवनासाठी मार्गदर्शक ठरतात. अहिंसा, सत्य, अस्तेय (चोरी न करणे), ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह (आसक्ती न ठेवणे) या तत्त्वांचे पालन केल्यास व्यक्तीला आंतरिक शांती आणि आत्मिक उन्नती साधता येते, असा संदेश या जयंतीतून दिला जातो.

या निमित्ताने प्रभातफेरी, शोभायात्रा, मंदिरांमध्ये विशेष पूजा-अर्चना, भजन-कीर्तन तसेच दानधर्माचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. बिहारमधील पावापुरी आणि राजगृह, गुजरातमधील पालिताना, राजस्थानमधील राणकपूर तसेच कर्नाटकातील श्रावणबेळगोळा या जैन तीर्थक्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होत आहे.महावीर जयंती हा केवळ धार्मिक सण नसून सामाजिक संदेश देणारा उत्सव आहे. अहिंसा, संयम आणि करुणेचा संदेश आजच्या धकाधकीच्या जीवनातही तितकाच महत्त्वाचा असल्याचे यानिमित्ताने अधोरेखित केले जाते. जैन समाज या दिवशी उपवास, व्रत आणि सेवा कार्याद्वारे समाजहित जपण्याचा संकल्प करतो.

# ठाण्यात पेपर कपवर वापरणाऱ्या हॉटेल व चहा टपरीवर दंडात्मक कारवाई होणार

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

ठाण्यात पेपर कपवर वापरणाऱ्या हॉटेल व चहा टपरीवर दंडात्मक कारवाई करण्याचे ठाणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने आदेश काढले आहे. पत्रकार विशाल कुरकुटे यांच्या तक्रारीनंतर ठाणे महापालिकेच्या सर्व प्रभाग समित्यांच्या सहायक आयुक्तांना परिपत्रकाद्वारे हॉटेल्स व चहा स्टॉल्सवर दंडात्मक कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.ठाणे महानगरपालिका यांनी शहरातील हॉटेल्स व चहा स्टॉल्समध्ये चहा पिण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पेपर कपविरोधात कारवाईचा इशारा दिला आहे. पत्रकार विशाल कुरकुटे यांनी केलेल्या तक्रारीनंतर महापालिकेने याची गंभीर दखल घेतली आहे. शहरातील अनेक ठिकाणी चहा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात पेपर कपचा वापर होत असून, त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो असे पत्रात नमूद करण्यात आले आहे. अशा कपमधील रसायनांमुळे कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने हा मुद्दा अत्यंत गंभीर मानला जात आहे. महापालिकेने स्पष्ट केले आहे की, नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सर्व हॉटेल्स व चहा स्टॉल्सवर कारवाई करून दंड आकारला जाणार आहे. संबंधित विभागांना तात्काळ तपासणी करून नियमांची अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ठाण्यातील चहा विक्रेत्यांनी आता नियमांचे पालन न केल्यास कारवाईला सामोरे जावे लागणार असून, नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणासाठी महापालिकेचा हा महत्त्वाचा निर्णय ठरत आहे.

# दादर-रत्नागिरी पॅसेंजर रेल पुन्हा दादर स्थानकापर्यंत करा

दैनिक वादळ वार्ता

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या पसंतीची दादर-रत्नागिरी पॅसेंजर रेल पुनश्च दादर स्थानकातून सुरु करण्यात यावी तसेच शक्य असल्यास ही गाडी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) पर्यंत विस्तारित करून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांना दिलास द्यावा, अशी मागणी मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रविंद्र वायकर यांनी निवेदनाद्वारे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे केली आहे. मुंबईहून कोकणात जाणाऱ्या लाखो सामान्य नोकरदार, शेतकरी, विद्यार्थी आणि कुटुंबियांसाठी दादर-रत्नागिरी पॅसेंजर ही केवळ एक रेल्वे नव्हती, तर त्यांच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग होती. मागील २५-३० वर्षांपासून ही गाडी नियमितपणे दादर स्थानकापर्यंत धावत होती. परंतु कोविड काळात ही सेवा बंद करण्यात आली आणि त्यानंतर रेल्वे प्रशासनाने एकतर्फी निर्णय घेत ती फक्त दिवा स्थानकापर्यंतच मर्यादित केली. यामुळे दैनंदिन कामकाज उरकून मुंबईहून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांना सोईस्कर ठरणाऱ्या या गाडीची सेवा दिवा पर्यंतच सीमित करण्यात आल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.दिवा स्थानकापर्यंत पोहोचण्यासाठी प्रवाशांना अतिरिक्त लोकल रेल्वेने प्रवास करावा लागतो, ज्यामुळे वेळ, खर्च आणि शारीरिक त्रास वाढतो. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि रात्रीच्या वेळेत प्रवास करणाऱ्यांसाठी ही अडचण अधिक गंभीर ठरते. रस्त्याने प्रवास करायचा झाल्यास मुंबई-गोवा महामार्गाची स्थिती अनेक ठिकाणी अत्यंत खराब आहे, ज्यामुळे प्रवास कठीण आणि धोकादायक होतो. अशा परिस्थितीत ही पॅसेंजर रेल कोकणातील सामान्य नागरिकांसाठी एक विश्वासार्ह, सोयीस्कर वाहतूक व्यवस्था होती, असे खासदार यांनी रेल्वे मंत्री यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## केरला स्टोरी पार्ट-२' मोफत शोला नांदेडमध्ये अभूतपूर्व प्रतिसाद

# धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून मुलींसाठी जागृतीचा उपक्रम ठरला चर्चेत

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड । हिंदू मुलींमध्ये जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांच्या पुढाकारातून आयोजित 'केरला स्टोरी पार्ट-२' या चित्रपटाच्या मोफत पाच शो उपक्रमाला नांदेडमध्ये अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला.

पहाटेपासूनच मुलींची मोठी गर्दी उसळली असून, सर्व शो हाऊसफुल्ल झाल्याने या उपक्रमाची सर्वत्र चर्चा रंगली आहे.

सोमवार, दि. ३० मार्च रोजी पीव्हीआर सिनेमा येथे भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल आणि अमरनाथ यात्री संघ यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी ७ ते दुपारी २ दरम्यान विविध स्क्रीनवर पाच शो आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या पहिल्या शोचे उद्घाटन संत बाबा बलविंदरसिंघ यांच्या हस्ते पार पडले.

यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. चैतन्यबापू देशमुख यांनी या उपक्रमाची दखल घेत ॲड. दिलीप ठाकूर यांना पद्म पुरस्कारासाठी राज्यपालांमार्फत शिफारस करण्याचा प्रयत्न केला जाईल, अशी ग्वाही दिली.





कार्यक्रमात मुलींचे पारंपरिक औक्षण करून स्वागत करण्यात आले, तर बुलंद घोषणाबाजी आणि पुष्पवृष्टीमुळे संपूर्ण वातावरण उत्साहाने भारून गेले होते. आकर्षक आणि संदेशपूर्ण रांगोळीने कार्यक्रमस्थळी सांस्कृतिक रंगत आणली. विशेष म्हणजे 'लव्ह जिहाद' विरोधात सजग राहण्याची घेतलेली शपथ हा कार्यक्रमातील सर्वाधिक प्रभावी क्षण ठरला. चित्रपट पाहताना अनेक मुली व महिलांना भावनिक अनावर होत अश्रू अनावर झाले.

विविध शोचे उद्घाटन संत बाबा बलविंदरसिंघ, ॲड. चैतन्यबापू देशमुख, मानिनी नांदेडकर, सुयोग कवटगी, शंकर वानेगावकर आणि अनिल चिद्रावार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेविका अमृता बजरंगसिंह ठाकूर, संगिता चारुदत्त चौधरी, मिली मोदी, स्नेहलता जायस्वाल, अनिलसिंह हजारी, राजेश केंद्रे, चंचलसिंह जट, वसुबेन पटेल आणि लक्ष्मी वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मोफत तिकीट उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या आशिष काबरा, श्रीराम मेडेवार, राज मड्डी, संजय केंद्रे, दिलीप मोदी, सतीश शर्मा, प्रशांत दामरगीद्दे, चारुदत्त चौधरी, प्रा. संजय पाटील, आकाश येमेकर, इंजि. जयचंद्र तत्तापुरे, प्राचार्य दीपक बच्चेवार, डॉ. प्रणद जोशी, सुरेश पळशीकर, पप्पू रिझवानी यांच्यासह अनेक दानशूर व्यक्तींचा यावेळी सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात संध्या छापरवाल व सविता काबरा यांनी मुलींचे औक्षण केले, तर शिवा लोट, सुरेश शर्मा व शिवचरण लोट यांनी पुष्पवृष्टी केली. उषा गवारे व पल्लवी नगारे यांनी साकारलेल्या रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधले. प्रकाश उंटवाले व अमित शिवपुजे यांनी स्मृतीचिन्ह देऊन सौ. जयश्री ठाकूर व ॲड. दिलीप ठाकूर यांचा सन्मान केला. धीरज स्वामी यांनी सूत्रसंचालन केले, तर राजेशसिंह ठाकूर यांनी आभार प्रदर्शन केले.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सरदार जयदेवसिंघ, अरुण काबरा, जगतसिंह ठाकूर, प्रभुदास वाडेकर, गणेशसिंह परमार, सुरेश निलावार, हितेश टांक, आकाश अग्रवाल, गिरीश पटवारी, संतोष भारती, शुभम साकळे, देवदत्त देशपांडे, गणेश कानगुले, बालाजी वाघमारे, संजय कोकुलवार, अशोक गिते, मनिषा तांबोळी, बाळू जोशी, वासुदेव बक्षी, गणेश देशमुख, जयंत देशपांडे, किरण देशपांडे, विश्वनाथ स्वामी आदींनी परिश्रम घेतले.

# व्यावसायिक समाजकार्य शिक्षणात सैद्धांतिक ज्ञान,क्षेत्रकार्य आणि संशोधन ही त्रिसुत्री महत्वाची

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

भारतामध्ये व्यावसायिक समाजकार्य शिक्षणाची सुरुवात सन १९३६ रोजी टाटा समाज विज्ञान संस्था, मुंबईच्या माध्यमातून झाली. त्यानंतर बी.एस.डब्ल्यू., एम.एस.डब्ल्यू., एम.फिल आणि पीएच.डी. या व्यावसायिक समाजकार्याच्या शिक्षणाच्या माध्यमातून आज समाजात सामाजिक अभियंते, मनोविकार तज्ञ, शिक्षक, प्राध्यापक, संशोधक, कौटुंबिक सम्युपदेशक, उद्योजक, संस्थाचालक, शेतकरी, प्रशासकीय अधिकारी, लेखक, कवि आणि सामाजिक कार्यकर्ते निर्माण करण्याचे कार्य केले जात आहे.

या अभ्यासक्रमामध्ये व्यावसायिक समाजकार्याचे सैद्धांतिक ज्ञान, व्यक्ती, गट आणि समुदायासोबत केलेले क्षेत्रकार्य आणि शास्त्रीय दृष्टिकोनातून केलेले समाजकार्य संशोधन ही त्रिसूत्री महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील प्रोफेसर डॉ.संजय गवई यांनी केले.




जवाहरलाल नेहरू समाजकार्य महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, नांदेड यांच्यावतीने महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये व्यावसायिक समाजकार्य शिक्षणात क्षेत्रकार्याचे महत्त्व या विषयावर एका विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.एन.जी.पाटील हे होते तर विचारमंचावर डॉ.प्रतिभा लोखंडे, डॉ.विद्याधर रेड्डी आणि प्रा.सुनील गोईनवाड यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.गवई म्हणाले की, या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्याला व्यवसायभिमुख आणि कौशल्याधिष्ठित बनविण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच विविध स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक असणाऱ्या इतिहास, राज्यशास्त्र, भूगोल, समाजकार्य, चालू घडामोडी, पर्यावरण, मराठी, हिंदी साहित्य आणि सूशासन आदि विविध विषयाचे अध्यापन आणि अध्ययन केले जाते असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य डॉ.एन.जी.पाटील म्हणाले की, व्यावसायिक समाजकार्य शिक्षणामध्ये क्षेत्रकार्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या महाविद्यालयात सैद्धांतिक ज्ञानासोबत क्षेत्रकार्य आणि संशोधन कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण पद्धतिने सहकारी प्राध्यापक आणि क्षेत्रकार्य संस्था पर्यवेक्षक यांच्या मार्गदर्शनाने आणि विद्यार्थ्यांच्या सहकार्याने पूर्ण केले जाते.

कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ.दिलीप काठोडे, डॉ.अंबादास कर्डिले, डॉ.सत्वशीला वरगंटे, प्रा.गोपाळ बडगिरे, ग्रंथपाल सुनील राठोड आणि राजेश्वर पाळेकर यांचीही उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.प्रतिभा लोखंडे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रा.सुनील बोईनवाड यांनी आणि आभार डॉ.विद्याधर रेड्डी यांनी मानले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अजय सुताडे आणि गणेश तेलंग यांनी परिश्रम घेतले.

# ग्रामीण भागातील वीज पुरवठा खंडित करण्याचे सत्र थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन-खा.चव्हाण यांचा महावितरणला इशारा

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड (प्रतिनिधी)-नांदेड जिल्ह्यात थकबाकीच्या नावाखाली अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित करण्याचा महावितरण विभागाने घेतलेला निर्णय हा अत्यंत दुर्दैवी,चुकीचा,अन्यायकारक आणि सर्वसामान्य जनतेला वेठीस धरणारा आहे. वीज पुरवठा खंडित करण्याचा निर्णय महावितरणने तात्काळ थांबवावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, अशा इशारा खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी दिला आहे.थकबाकीच्या नावाखाली जिल्ह्यातील अनेक गावांचा वीज पुरवठा खंडित करण्याचे सत्र महावितरणच्यावतीने सुरु करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर खासदार रवींद्र चव्हाण यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.आधीच अवकाळी पाऊस, शेतीमालाचे नुकसान, आर्थिक संकट आणि पिण्याच्या पाण्याच्या समस्येमुळे शेतकरी व ग्रामीण जनता प्रचंड अडचणीत असताना महावितरणने घेतलेला हा निर्णय संतापजनक असल्याचे ते म्हणाले.काही व्यक्ती अथवा काही गावांमध्ये थकबाकी असू शकते; मात्र त्याचा फटका



संपूर्ण गावातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, लहान व्यावसायिक आणि पाणीपुरवठा व्यवस्थेला बसणे हा अन्यायाचा कळस आहे. थकबाकी वसुलीच्या नावाखाली जनतेला अंधारात ढकलण्याचा अधिकार कोणत्याही यंत्रणेला नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.वीज पुरवठा बंद झाल्यामुळे मोटारपंप बंद पडले असून पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकर्यांची पिके धोक्यात आली आहेत, विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे, किरकोळ व्यवसाय व उद्योगधंदे ठप्प झाले आहेत.महावितरणने थकबाकी वसुलीसाठी संवाद, हप्ते, विशेष मोहीम किंवा स्थानिक स्तरावर समन्वयाचा मार्ग स्वीकारण्याऐवजी थेट वीज पुरवठा खंडित करण्याचा टोकाचा निर्णय घेऊन आपली असंवेदनशीलता दाखवून दिली आहे. हा निर्णय जनतेच्या सहनशीलतेचा अंत पाहणारा असून लोकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला आहे. जिल्हा प्रशासनाने या गंभीर विषयात तात्काळ हस्तक्षेप करून महावितरणचा हा जनविरोधी आदेश त्वरित रद्द करावा आणि संबंधित गावांचा वीज पुरवठा पूर्ववत सुरू करावा. अन्यथा जनतेच्या वाढत्या संतापाचा उद्रेक होऊन निर्माण होणार्या परिस्थितीस पूर्णपणे प्रशासन आणि महावितरण जबाबदार राहील. जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणार्या अशा निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

# सौ.शांता हाराळे यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहर (आकुर्डी ) येथील सरस्वती प्राथमिक विद्यामंदिर शाळेच्या आदर्श सहशिक्षका पेठवडज (ता.कंधार )च्या भुमिकन्या सौ.शांता रोहीदास हाराळे ह्या ३३ वर्ष ७ महीने यशस्वी सेवा करुन दिनांक ३१ मार्च रोजी नियतवयोमानानूसार सेवानिवृत्त होत आसल्याबद्दल शाळेच्या वतीने आज दिनांक ३० मार्च रोजी सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आसल्याची माहीती देण्यात आली आहे सदरील सेवापुर्ती गौरव सोहळा निगडी प्राधिकरण जवळील अरविंद वृंदा सभागृहात सकाळी ११ वाजता आयोजीत केला असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे प्रमुख डॉ.गोविंदराव दाभाडे यांची प्रमुख उपस्थीती राहाणार आहे . त्याचबरोबर शाळेचे मुख्याध्यापक
राजीव माळे यांसह आदी मान्यवर मंडळीची उपस्थीती राहील . यावेळी शाळेच्या सहशिक्षका सौ.शांता रोहीदास हाराळे यांचा संस्थेच्या वतीने यथोचित्त सन्मान करण्यात येणार आहे .

# मराठा सेवा संघ बैठक लातूर येथे उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**

शनिवार दिनांक २८मार्च २०२६ रोजी मराठा सेवा संघ जिल्हा शाखा लातूरची बैठक विश्राम गृह येथे उत्साहात पार पडली.

सदर बैठकीला महाराष्ट्र प्रदेश महासचिव शिवश्री चंद्रशेखर शिखरेसाहेब, ज्येष्ठ मार्गदर्शक शिवश्री नेताजी गोरेसाहेब, प्रदेश उपाध्यक्ष शिवश्री संदीपान जाधव,केंद्रीय कार्यकारणी सदस्य शिवश्री लिंबराज सूर्यवंशी, व्हि टी शिंदे विभागीय अध्यक्ष, वैभव तळेकर केंद्रीय कार्यकारणी सदस्य, नवघरे संभाजी राष्ट्रीय अध्यक्ष शिक्षण महर्षी पंजाबराव देशमुख शिक्षक परिषद उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी मराठा सेवा संघाची वाटचाल गतिमान व्हावी, सर्व स्थरावर संघटनेची वाढ व्हावी यासाठी वर्षभराचा कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे या विषयांन्वये महत्त्वपूर्ण सूचना व मार्गदर्शन केले.

मीटिंगमध्ये प्रदेश महासचिव शिखरेसाहेबांनी मांडलेल्या प्रमुख बाबी --

१) दिनांक १४ मे पर्यंत सर्व तालुका शाखा,तसेच सर्व कक्षांचे अकार्यरत पदाधिकारी बदलून तिथे नवीन वेळ देणारे पदाधिकारी नेमावेत. २) संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, वीर भगतसिंग विद्यार्थी परिषद, वधुवर कक्ष, कृषी कक्ष, वारकरी परिषद या सहा कक्षांची प्राधान्याने कार्यकारिणी करून पूर्ण ताकदीने कक्षांचे काम सुरू करण्याविषयीच्या सूचना देण्यात आल्या.३) वधू वर कक्षाच्या माध्यमातून लग्न जमविण्यासाठी मेळावे घेत असताना लग्नानंतर निर्माण होणाऱ्या काडी मोड पर्यंतच्या अडचणी सोडविण्यासाठी उपाय योजना करण्यासाठी जिजाऊ ब्रगेड व समेट कक्षामार्फत खास प्रयत्न करणे. ४) जिल्हा तालुका शाखेच्यावतीने वर्षभर राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाचा कृती आराखडा तयार करून त्याची योग्य ती अमलबजावणी करणे. ५) वारकरी कक्षाच्या माध्यमातून कीर्तनकार तयार करून सेवा संघाच्या विचारांची प्रबोधनाची फळी तयार करणे.६) जिल्हा व तालुका पातळीवर प्रत्येक महिन्याला बैठक आयोजित करून कार्याचा आढावा सादर करणे. ७) प्रत्येक मासिक मीटिंगला कार्यकारणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. अनुपस्थित पदाधिकऱ्यांना पदमुक्त करावे. ८) लातूर विभागाची एकत्रित बैठक आयोजित करून समन्वय ठेवणे. याशिवाय मा शिखरे साहेबांनी जिल्हा तालुका पदाधिकाऱ्यांनी उपस्थित केलेल्या अडचणी व शंकांचे निरसन केले. जालना जिल्ह्यातील बचत गटांच्या माध्यमातून उभं केलेलं सभासदांच जाळं आणि मराठा सेवा संघाच्या वसतिगृह, हॉल, अभ्यासिका आदी सुंदर वास्तू याची प्रेरणादायी माहिती प्रदेश उपाध्यक्ष संदीपान जाधव यांनी दिली. संघटना बांधणीसाठी रोज किमान एक तास वेळ देणे आवश्यक असून कामाशिवाय समाज बांधवांना भेटत व बोलत राहिल्यास संघटन वाढीस मदत होते असे नमूद केले. लिंबराज सूर्यवंशी व वैभव तळेकर यांनी मनोगत व्यक्त केले व काही उपाय सांगितले.




समारोपीय भाषणात ज्येष्ठ मार्गदर्शक नेताजी गोरे साहेब यांनी लातूरच्या जुन्या उत्कृष्ट कामगिरीच्या आठवणींना उजाळा देत संयमी, समाजाची ओढ असणारी माणसं जोडून लातूर जिल्ह्याने पुन्हा एकदा आपली कामाची चमक दाखवावी असे आवाहन केले. यावेळी दयानंद पाटील पोलिस निरीक्षक संभाजी नगर, कार्यकारणी पदाधिकारी, तालुका अध्यक्ष तसेच कक्षाचे अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.मीटिंगची सुरुवात जिजाऊ पूजन व सामुहिक जिजाऊ वंदनेने झाली. जिल्हासचिव जाधव एम एम यांनी प्रास्ताविकात मीटिंग आयोजनाचा हेतू विशद केला. कार्यक्रमाचे सूत्र संचलन जतूसापचे प्रवक्ते सतीश हाणेगावे यांनी केले. यावेळी छत्रपती शिवरायावर पीएचडी केल्या बद्दल विवेक सौताडेकर यांचा सत्कार करण्यात आला.मराठा सेवा संघ व कक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी मनोगते व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहन जाधव अध्यक्ष, थोरात सर, कार्यालयीन सचिव बरमदे डी बी, धनंजय उज्जनकर जाधव डी व्ही, मिथुन दिवे, यांनी परिश्रम घेतले.यावेळी सर्व कक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.मीटिंग उत्साही वातावरणात पार पडली

# श्री क्षेत्र नारायण गडचे मठाधिपती प्रेम मूर्ती महंत शिवाजी महाराज यांचे उमापुरात उस्फुर्त स्वागत



**दैनिक वादळ वार्ता**
**उमापूर । प्रतिनिधी**

उमापूर गेवराई तालुका येथे श्री क्षेत्र नारायण गड येथील कैलासवासी महंत महादेव महाराज यांच्या कृपाशीर्वादाने महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते उमापूर येथे ७४ वा नारायणगडचा फिरता अखंड हरिनाम नारळी सप्ताहाचा उत्स्फूर्त महंत शिवाजी महाराजांचं उमापूर स्वागत ३१ मार्च रोजी नारायण गड श्री क्षेत्र नारायण गड ते उमापूर येथे महंत शिवाजी महाराज गिरी यांचे हेलिकॉप्टरने उमापूर येथे ठीक एक वाजता उत्स्फूर्त असा आगमन झालेलं असून मार्केट कमिटी उमापूर ते ७४ वा नारळी सप्ताह सभा मंडपापर्यंत मंथ शिवाजी महाराज यांचं उत्स्फूर्त अशी भव्य मिरवणूक उमापूर ग्रामस्थांच्या व परिसराच्या भाविक भक्ताने अत्यंत देखणे थाटामाटात संपन्न झाली या मिरवणुकीचे वैभव आश्वांचे मिरवणूक रथ उत्कृष्ट असे रथ रथासमोर उत्कृष्ट असे घोड्यांचे शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात वेशभूषा चे झाशीच्या राणीची वेशभूषा असलेले थोर महापुरुषाचे वेशभूषा असलेले जिवंत घोड्याचे देखावे त्याच्यानंतर जिवंत बैलगाडी खिल्लारी बैलाचे देखावा ढोल पथक लेझीम पथक शाळेतील विद्यार्थिनींचे बोला उमापूर जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थी विद्यार्थिनींचे थोर महापुरुष यांचे हुबेहू वेशभूषा केलेले देखावे ट्रॅक्टरवर लहान मुलांचे देखावे त्याच्यानंतर उमाई पब्लिक स्कूल येथील विद्यार्थिनींचे बालगोपाळांचे ट्रॅक्टर वर देखावे ढोल पथक झांज पथक बँड पथक डीजेच्या तालावर टाळ मृदंगाच्या गजरात उमापूर येथील एकाच वेशभूषा हजारो महिला कलशधारि अनेक विद्यार्थिनी युवक युती अनेक महापुरुषांच्या प्रतिकृती वेशभूषा या मिरवणुकीचे वैभव ठरत असून या मिरवणुकीत या मिरवणुकीमध्ये अत्यंत जिवंत देखावे या मिरवणुकीच्या वैभवात प्रसन्नतेत भर पडत असून उमापूर परिसरातील लाखो भाविकांच्या उपस्थितीत आज उमापूर नगरी ही भक्तिमय वातावरणात अखंड हरिनाम सप्ताहाच्या ज्ञान यज्ञ व अखंड अन्नज्ञानाचा यज्ञ आज प्रारंभ होता असून ३१ मार्च ते सात एप्रिल पर्यंत या ज्ञान यज्ञात अखंड अशी अविरत सेवा या हरिनामाच्या गजराने उमापूर नगरी दुमदुमले जात असून या परिसरातील उमापूर गेवराई तालुक्यातील सर्व परिसरातील नारायण गडांचे भाविक भक्ताने बहुसंख्येने या ज्ञानेज्ञाचा भक्तिमय वातावरणाचा लाभ घ्यावा असं समस्त उमापूर मारुतीची वाडी ग्रामस्थांच्या तर्फे आव्हान करण्यात येत आहे उपस्थिती कोणा कोणाची होती उमापूरचे नगद नारायण महाराजांची जन्मभूमीशी क्षेत्र सुरळगाव संस्थांचे मताधिपती रंगनाथ महाराज माऊली संस्थान बोरी पिंपळगाव येथील मठाधिपती महंत नामदेव महाराज शेटेकर जगदंबा संस्थान बोरगाव चे मन महाराज महंत निंबाळकर राजे महाराज व राम कथाकार राम कथाकार श्री हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा केज नारळी सप्ताह नगद नारायण महाराज संस्थानचे सर्व ट्रस्टी परिसरातील भावी भक्त महिला या उत्स्फूर्त सोहळ्यात लाखोच्या संख्येने भक्तीमय वातावरणात हा सोहळा संपन्न झाला असून या सोहळ्यास प्रारंभ झाला असून हा भक्तीचा जनसागर लाखो या भाविकांच्या उपस्थितीत पार पडला अरे उमापुरात प्रेम मूर्ती शिवाजी महाराजांनी पुष्पवृष्टी केली संपूर्ण मिरवणुकी जेसीबी द्वारे सर्व भाविक भक्तावर फुलांची उधळण मिरवणुकीचे खास आकर्षण ठरले या मिरवणुकीत मुंबई पब्लिक स्कूल जिल्हा परिषद शाळा उमापूरचे विद्यार्थिनीचे देखावे अत्यंत जिवंत देखावे मिरवणुकीचे मुख्य वैशिष्ट्य ठरले या मिरवणुकीत किमान विषयक अश्व अश्वांची नाच हा मिरवणुकीचे खास आकर्षण ठरले ढोल पथक लेझीम पथक या मिरवणुकीस चकलांबा पोलीस स्टेशनचे पीआय इंगळे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली उमापूरची संपूर्ण पोलीस यंत्रणा पार पाडण्यासाठी चकलांब्याचे पीआय इंगळे साहेब व त्यांचे उमापूर पोलीस चौकीचे सर्व कर्मचाऱ्यांनी चोक बंदोबस्त बजावला गावाला प्रदक्षिणा घालून हेलिकॅप्टर द्वारे महंत शिवाजी महाराजांनी गावात पुष्पवृष्टी केली गेवराई नगर परिषदेच्या द्वारे अग्निशामक दलाच्या गाड्या उमापूर प्राथमिक आरोग्य केंद्राची म्बुलन्स व त्यांची डॉक्टरची टीम उपस्थित होती या अखंड हरिनाम सप्ताहासा नारायणगड च्या सर्व भाविक भक्तांनी महिलांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नाम सप्ताह कमिटी कमिटी करत आहे.

# प्रसिद्ध शाहिर व्यंकटराव बेटकबिलोलीकर यांचे निधन

**दैनिक वादळ वार्ता**
**नायगाव । प्रतिनिधी**

आपल्या बहारदार पोवाडा सादरीकरणाने सर्वत्र ज्यांची ओळख झाली असे प्रसिद्ध शाहीर व्यंकटराव पेंटाजी ईजेवार बैटकबिलोलीकर यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी नांदेड येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान दिनांक ३० मार्च रोजी रात्री एक वाजता निधन झाले असून त्यांच्या पश्चात दोन मुले तीन मुली सुना नातू, पणतू असा मोठा परिवार आहे.



शाहीर व्यंकटराव बैटक बिलोलीकर यांनी जवळपास ४० वर्ष रसिक जणांची सेवा केली बहारदार पोवाडा सादरीकरण करून माणसाच्या अंगातील रक्त सळसळणारे राष्ट्र महापुरुषांच्या विचारावरील पोवाडे सादरीकरण त्यांनी केले. यामुळे त्यांची महाराष्ट्रभर ओळख निर्माण झाली त्यांना उर्फ बि.बी या नावाने सर्व कलावंत आणि रसिक जन ओळखीत होते. त्यांची जन्मभूमी नायगाव तालुक्यातील बैटकबिलोली येथे अंत्यसंस्कार करण्यापूर्वी शोकसभा आयोजित केली यामध्ये अनेकांनी आपले मत व्यक्त केले असून अभिनेता रामेश्वर भालेराव उर्फ ज्युनिअर जॉनी लिव्हर यांनी शोकसभेत म्हणाले की, पोवाडा सादरीकरण म्हणजे पश्चिम महाराष्ट्रातल्याच कलावंताचे नाव पूर्वी ऐकायला मिळत होते पण त्यांच्यापेक्षा कितीतरी पटीने शाहीर वेंकटराव बेटकबिलोलीकर यांनी पोवाडा सादरीकरण केला तर त्यांचे हा गुन्हा माझा हे नाटक देखील लोकप्रिय झाले असे सांगत त्यांच्या कार्याला त्यांनी उजाळा दिला. शाहीर वेंकटराव बैटक बिलोलीकर यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आलेल्या वेळी प्रसिद्ध शाहीर दिगु तुमवाड शाहीर रमेश गिरी,बालाजीराव शिंदे कॉम्रेड अशोक घायाळे आशाताई देगलूरकर अच्युत पिंगळे, माजी मुख्याध्यापक नकाते, दापसे,शाहीर बळीराम जाधव, त्रिरत्नकुमार भवरे शाहीर चंद्रकांत गायकवाड यासह महिला पुरुष यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती

# एलसीबीची 'फिल्डिंग' यशस्वी; शहाद्यात ५५० लिटर स्पिरीट पकडले,एकाला बेड्या

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । प्रतिनिधी**

शिरपूरकडून धडगावकडे अवैधपणे स्पिरीटची वाहतूक करणाऱ्या बोलेरो वाहनावर स्थानिक गुन्हे शाखेने शहादा शहरात सापळा रचून मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी तब्बल ८ लाख ६५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला ताब्यात घेतले आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, शिरपूर (जि. धुळे) येथून कहाटूळ मार्गे धडगावकडे एका पांढऱ्या रंगाच्या बोलेरो वाहनातून दारू तयार करण्यासाठी लागणाऱ्या स्पिरीटची अवैध वाहतूक होणार होती. या माहितीची खातरजमा करून स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांनी तात्काळ पथकाला कारवाईच्या सूचना दिल्या.



स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शहादा शहरातील मामाचे मोहिदा चौफुली परिसरात पाळत ठेवून सापळा रचला. संशयित पांढऱ्या रंगाचे बोलेरो वाहन (क्र. एम एच ०४ ई एस ९६५१) येताच पथकाने त्याला अडवून तपासणी केली. यावेळी वाहनात मोठ्या प्रमाणात स्पिरीटचा साठा आढळून आला.पोलिसांनी वाहनातून ५५० लिटर स्पिरीट आणि बोलेरो वाहन असा एकूण ८,६५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी वसंत कुसाल पावरा (वय २६, राहणार बिलगाव, ता. धडगाव) याला जागीच ताब्यात घेण्यात आले. त्याच्यासोबत असलेला दुसरा इसम अंधाराचा फायदा घेत पळून गेला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्रवण दत्त.एस, अप्पर पोलीस अधीक्षक आशित कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक हेमंत पाटील, उपनिरीक्षक मुकेश पवार, विकास गुंजाळ, पुरुषोत्तम सोनार, मोहन ढमढेरे, जितेंद्र पाडवी, विकास कापुरे, शोएब शेख, भरत उगले व सतीष घुले यांच्या पथकाने केली. आरोपींविरुद्ध शहादा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

# मांडवी येते बालमीत्र मेळावा संमेलन जवळपास तेविस वर्षानंतर सर्वे मित्राची भेट



**दैनिक वादळ वार्ता**
**मांडवी । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातील मांडवी या गावात जिल्हा परिषद हायस्कूल मांडवी येथे २००३ यावर्षी दहावी झालेले यांनी बाल मीत्र मेळावा आयोजित करण्यात आले आहे तबल तेविस वर्षानंतर वर्ग १ ली ते १० वीपर्यंत शिकलेले सर्व मित्र एकत्र आल्याने सर्वाच्या चेहरा आनंद मय झाल होता मांडवी नगरीत हा अनोखा मेळावा रवींद्र जंगलेवाड,
श्री सुरेश चव्हाण नायक
बादल राठोड लकी राठोड अंकुश राठोड यांनी आयोजन करून सर्व आपली जुनी बैच.२००३.वर्ग दहावी.जुनी आठवण हा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवले होते तर दीपा कांबळे व दिलीप श्रीमनवार यांनी आणेसे उस के आये बहार.... या गाण्यात सर्व मित्राचे मनोरंजन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र जंगलेवाड तर आभार प्रदर्शन सचिन चव्हाण सर यांनी केले. या कार्यक्रमाला छाया मॅडम, आकाश सर, नागेश सर, कांबळे सर, नरेश, नवीन, विनोद व संपूर्ण माजी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाची संपूर्ण मांडवी परीसरात अभिनंदन होत आहे..

# आज पासून छत्रपती संभाजी नगर तालुक्यातील ग्रामरोजगार सहाय्यक संपावर नरेगाचे काम ठप्प होणार



**दैनिक वादळ वार्ता**
**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील सर्व ग्राम रोजगार सहाय्यक १ एप्रिल पासून संपावर जात आहे असे निवेदन द्वारे गटविकास अधिकारी छत्रपती संभाजी नगर येथील श्रीमती मिना रावताळे यांना निवेदन देले आहे कारण शासनाने ३ ऑक्टोबर २०२४ रोजी ग्रामरोजगार सहाय्यक यांना आठ हजार रुपये मानधन देण्याचा जीआर काढला आहे प्रत्यक्षात १८ महिने उलटूनही जीआरची अंमलबजावणी होत नाही तसेच वि बि जि रामजी मध्ये दररोज मजुराचे फेसऑथेंटीकेशन करणे अनिवार्य आहे तसेच त्यासाठी मोबाईल रिचार्ज पेट्रोल खर्च शासन देत नाही ग्रामरोजगार सहाय्यक यांचे शोषण चालू आहे त्यामुळे ग्राम रोजगार सहाय्यक यांच्या मध्ये नाराजगी आहे तरी ३ ऑक्टोबर २०२४ जीआर ची अंमलबजावणी तत्काळ करावी त्यासाठी राज्यभरात संप चालू असून यावेळी तालुकातील भाऊसाहेब भेरे हारून शेख.शिवा पाटेकर.गनेश बोचरे. नरसिंग चव्हाण. कौतिक काकडे. अमोल निकाळजे. नितीन चव्हाण.मोहन विर . पवन दु. तालुक्यातील रोजगार साहय्याक आदी उपस्थिती होते या शासनाने निवेदन चे दखल घ्यावी

# अवकाळी पाऊस वाऱ्यामुळे ज्वारी पीक झाले भुईसपाट

## पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी



**दैनिक वादळ वार्ता**
**हनेगाव । प्रतिनिधी**

लोणी व परिसरात काल अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे जोरदार तडाखा देत शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.या आपत्तीत शेतकऱ्यांचे कांदा, गव्हू, ज्वारी, पीक अक्षरशः भुईसपाट झाले आहे.

नुकसानी नंतर देखील पंचनामे होत नसल्याचे परिसरातील शेतकरी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत असून प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

लोणी व परिसरात ३० मार्च रोजी अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यासह मेघगर्जनेसह पाऊस झाला त्यामुळे अती वेगाने वारे असल्याने शेतातील रब्बी ज्वारी, गहू, कांदा भुईसपाट झाले आहे.

# तिसगाव मध्ये मोठ्या उत्साहात भगवान महावीर जयंती साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**तिसगाव । प्रतिनिधी**

तिसगाव सर्कल परिसरात जैन समाजासह सर्व धर्मीय नागरिकांच्या सहभागातून भगवान महावीर जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात आली. यानिमित्त भगवान महावीर यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले.

मिरवणूक गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आली असून ठिकठिकाणी नागरिकांनी स्वागत केले. धार्मिक वातावरणात पार पडलेल्या या मिरवणुकीची सांगता आशीर्वाद मंगल कार्यालय येथे करण्यात आली. यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले.




या कार्यक्रमासाठी डॉ. ऋषिकेश कुलकर्णी, प्रकाश रामदासी महाराज, काशिनाथ पाटील लवांडे, भाऊसाहेब लोखंडे, शिवशंकर राजळे, दादा महाराज नगरकर, मन्सूर मौलाना यांसह पंचक्रोशीतील अनेक मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जैन समाजातील तरुण वर्गाने पुढाकार घेतला. सुनील शेठ शिंगवी, शांतीलाल परमार, डॉ. नरेंद्र फिरोदिया, अतुल बोरा, संतोष छाजेड, सुनील गांधी, अभय मुथा, संजय गांधी तसेच इतर कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. या उत्सवामुळे तिसगाव परिसरात सामाजिक ऐक्य आणि धार्मिक सौहार्दाचे सुंदर दर्शन घडले.

# त्यागातूनच राज्य व केंद्रात भाजपचे सरकार आहे-दत्ता कुलकर्णी

**दैनिक वादळ वार्ता**
**भूम । प्रतिनिधी**

प्रत्येक क्षेत्रात त्याग केल्या शिवाय फळ मिळत नाही, जनसंघाच्या माध्यमातून अनेकांनी त्याग केला, त्यांच्या विचारधारेवर भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून केंद्र, राज्यात आणि जिल्ह्यात सरकार आहे . प्रगत राष्ट्रासाठी ही बाब समाधानकारक असल्याचे मत जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय प्रशिक्षण अभियानाच्या समारोप प्रसंगी व्यक्त केले .

शनिवार दि . २८ व रविवार दि २९/३/ २०२६ या दोन दिवसाच्या कालावधीचे भारतीय जनता पार्टीच्यावतीने भूम शहर व ग्रामीण मंडल स्तरीय प्रशिक्षण वर्ग श्री संत गजानन महाराज मंदिर सभागृहात माजीमंत्री आ . राणाजगजितसिंह पाटील, माजी आ. सुजितसिंह ठाकूर राज्य परिषद सदस्य तथा मतदार यादी पुनरनिरीक्षण विधानसभा अध्यक्ष बाळासाहेब क्षिरसागर . जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले सात सत्रामध्ये विविध विषयावर वक्त्यांनी सखोल मार्गदर्शन केले . नितीन काळे यांनी मीडिया व मन की बात, सचिन घोडके यांनी नमो प सरल प, रामदास कोळगे यांनी बुथ व्यवस्थापन, देविदास पाठक यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व परिवार , सौ अस्मिता कांबळे यांनी राज्य व केंद्र सरकारच्या योजना व कामगिरी संदर्भात शिवाजी गिट्टे यांनी पुढील कार्यक्रम संदर्भात, बाळासाहेब क्षिरसागर यांनी एस आय आर मतदार यादीच्या पुनर्ननिरीक्षणा संदर्भात तर दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी वैचारिक अधिष्ठान या विषयावर सखोल मार्गदर्शन केले . सचिन घोडके यांनी प्रशिक्षणार्थींच्या मोबाईलच्या माध्यमातून प्रत्येकाला सरल पच्या माध्यमातून प्रशिक्षणाची माहिती नोंद करण्यास सहाय्य केले . दरम्यान मन की बात हा देखील कार्यक्रम चित्रफितीच्या माध्यमातून सर्वांनी पाहिला व ऐकला .

दोन दिवसाच्या प्रशिक्षण वर्गात तालुक्यातून १६३ बूथ प्रतिनिधी निवासी उपस्थित होते . सर्व प्रशिक्षणार्थींची भोजन निवास व्यवस्था देखील चांगल्या पद्धतीची केली होती . यात महिलांची सुद्धा उपस्थिती चांगली होती .

संपूर्ण प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणाचे प्रभारी दत्ताभाऊ राजमाने , तालुका अध्यक्ष संतोष सुपेकर, शहर अध्यक्ष बाबासाहेब वीर, महिला तालुका अध्यक्ष सौ स्वाती तनपुरे शहराध्यक्ष सौ विद्या खामकर , मन की बात व्यवस्थापन करणारे सिद्धार्थ जाधव, शुभम खामकर तसेच नगरसेवक तथा प्रभारी आबासाहेब मस्कर , शांतीराज बोराडे, बापू बगाडे , संदीप खामकर, शरद चोरमले, रघूनाथ वाघमोडेसह अनेकांनी परिश्रम घेतले .

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077